महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

---

# ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग

जिल्हा सिंधुदुर्ग

सन २०२५-२०२६

भांडार - इंटरनेट सुविधा

विषय- ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग जिल्हा सिंधुदुर्ग येथे १५० MBPS इंटरनेट सुविधा पुरवण्याकरीता दरपत्रके देण्याबाबत.....

(१)जाहिर सूचना दि. २६/०२/२०२६
(२)अंतिम दिनांक. ०५/०३/२०२६
(३)दर पत्रके उघडणेचा दि.०५/०३/२०२६

महाराष्ट्र शासन

# वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग

कसई दोडामार्ग ता.दोडामार्ग जिल्हा सिंधुदुर्ग - ४१६५१२

| कार्यालय दूरध्वनी क्र. -<br>कार्यालय फॅक्स क्र.-<br>आरोग्य सेवा | ०२३६३<br>२५६६१७ | ई-मेल - msrhdodamarg@yahoo.co.in<br>जा.क्र.ग्रारुदो/भांडार/इंटरनेट कनेक्शन/ 1136 /२०२६<br>दिनांक :- २६.०२.२०२६ |
|---|---|---|

## दरपत्रक मागविणारी जाहिर सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान इ सुश्रुत कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग येथे एक वर्षाकरीता इंटरनेट सुविधा परविणेसाठी मक्तेदारांकडून सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्यासाठी खालील अटी शर्तींना अधिन राहून इच्छुक पुरवठादारांकडून मोहोरबंद पाकिटातून दरपत्रके मागविणेत येत आहेत.विहित अटी व शर्तींची पुर्तता करणा-या पुरवठादार यांनी वैद्यकिय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय दोडामार्ग यांच्या नावे दरपत्रके दिनांक २६/०२/२०२६ ते ०५/०३/२०२६ या कालावधीमध्ये आणि दिनांक ०५/०३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने अथवा प्रत्यक्ष वैद्यकिय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय दोडामार्ग यांचे कार्यालयामध्ये आणून द्यावयाची आहेत.

| अक्र | आवश्यक बाबींचा तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | ग्रामिण रुग्णालय दोडामार्ग येथे १५० MBPS इंटरनेट सुविधा पुरविणे | वार्षिक दर |

**लिफामध्ये दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे-**

१) संस्थेच्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे.
२) शॉप ॲक्ट लायसन्स झेरॉक्स प्रत.
३) नमूद उपकरणांसंबंधित निर्माता कंपनी तसेच तांत्रिक माहिती.
४) सदर कामाचा अनुभवाचा दाखला
५) जीएसटी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत.
६) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत.
७) बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत.
८) आधारकार्डची झेरॉक्स प्रत.
९) रद्द केलेला धनादेश.

## अटी व शर्ती

१) दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहोचणे आवश्यक आहे.
२) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.
३) सिलबंद लखोटयावर राष्ट्रीय आरोग्य अभियान, ई शुश्रुत इंटरनेट पुरविणेसाठी दरपत्रक असा उल्लेख करावा.
४) इंटरनेट सेवा ही २४×७ कालावधीसाठी ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग येथे उपलब्ध असावी, त्यासाठी इतर कुठलाही अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही.
५) विहित मुदतीत प्राप्त न होणारी दरपत्रके नाकारणे तसेच आवश्यक ते सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकार वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग यांचेजवळ राहतील. याबाबत कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही अगर न्यायालयात जाता येणार नाही.
६) साहित्याचे दर सर्व करांसहित एक वर्षाकरिताचे असावेत.
७) दरपत्रक धारकाने सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून आणि समजावून घेवून दरपत्रक सादर करावे. शंका असल्यास त्याबद्दल स्पष्टीकरण घ्यावे. परंतु त्यासाठी दरपत्रक सादर करण्यासाठी दिरंगाई करता येणार नाही.
८) दरपत्रक धारकाने आपल्या भाडयाचे दर अंकात आणि अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात स्पष्ट करावेत. दोन्ही मध्ये फरक आढळल्यास अक्षरी दर वैध ठरविला जाईल.
९) दरपत्रक सादर करताना मुद्रणात झालेली खाडाखोड साक्षांकित करुन पूर्ण स्वाक्षरीसह दरपत्रक धारकाने सादर करावी.

१०)कंत्राटदाराच्या कामगारांना कार्यालयाच्या परिक्षेत्रात येण्यासाठी सुरक्षेच्या वर्तमान कायद्यानुसार ओळखपत्र काढण्याची व सर्व सुरक्षा उपाय पाळणेची जबाबदारी मक्तेदारांची राहील. ओळखपत्राशिवाय कामगारांना कार्यालय परिक्षेत्रात प्रवेश करता येणार नाही.
११)कराराच्या दरम्यानच्या काळात दरांच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत/ तशी मागणी करता येणार नाही.
१२)ज्या कालावधीमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकांतून वसुल करणेत येईल.
१३)कोणतेही कारण न देता इंटरनेट सुविधेसाठी केलेला करार केंव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक यांनी राखून ठेवलेला आहे.
१४)पुरवठादार संस्थेचे/मालकाचे नोंदणी प्रमाणपत्र,उद्योग प्रमाणपत्र,जीएसटी नंबर प्रमाणपत्र दरपत्रकासमवेत जोडणे आवश्यक आहे.
१५)पुरवठादार संस्थेचे/मालकाचे पॅनकार्ड सत्यप्रत दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
१६)कार्यारंभ आदेश भेटल्यानंतर दोन दिवसात पुरवठादाराने सदर सेवा देणेचे बंधनकारक आहे.
१७)कार्यारंभ आदेश भेटल्यानंतर पुरवठादाराने बॅंकेचा कॅन्सल चेक देणे बंधनकारक राहील.
१८)देयके SNA SPARSH प्रणालीतून शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर अदा करणेत येतील.

दरपत्रके सिलबंद लखोटयात दिनांक ०५/०३/२०२६ दुपारी २:०० वाजता वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग यांचे दालनात सहभागी मक्तेदारांचे उपस्थितीत अथवा

मक्तेदार उपस्थित न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थितीमध्ये उघडण्यात येतील. संबंधित मक्तेदारांनी दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहणा-या मक्तेदारांचे हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची मक्तेदारांनी नोंद घ्यावी.

नोटीस प्रसिद्ध दिनांक - २६ /०२ /२०२६
प्रसिद्धीचे स्थळ -

१) ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग कार्यालयाचे नोटीस बोर्ड
२) www.nrhm.maharashtra.gov.in
३) www.arogya.maharashtra.gov.in
४) NHM पोर्टल

प्रत माहितीसाठी सविनय सादर
मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग

MEDICAL SUPRITANDENT, R.H. Dodamarg, Dist. Sindhudurg

Medical Superintendent Class-
Rural Hospital,Dodamarg
District Sindhudurg

# दरपत्रक सादर करण्याचा नमुना

दिनांक:-

प्रति,
मा. वैद्यकिय अधिक्षक
ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग

विषय:- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत इंटरनेट सुविधा पुरविणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत...

संदर्भ:- आपले कार्यालयाकडून दिनांक २६/०२/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली जाहीर सुचना.

मा.महोद्य,

वरील विषयास अनुसरुन ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग ता. दोडामार्ग जि. सिंधुदुर्ग येथे आम्ही खालील तक्त्यात नमुद दरानुसार इंटरनेट सुविधा पुरविणेस तयार आहोत. तसेच दरपत्रकामध्ये नमुद सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत.

तरी कृपया आमचे दरपत्रक स्वीकारुन आम्हाला आपणास सेवा पुरविणेची संधी द्यावी ही नम्र विनंती.

| अ. क्र | तपशील | इंटरनेट पुरविणा-या संस्थेचे/मालकाचे नाव | वार्षिक दर |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण रुग्णालय दोडामार्ग येथे इंटरनेट सुविधा पुरविणे | | |

स्वाक्षरी
पुरवठादाराचे नाव
दुरध्वनी क्रमांक
पत्ता

# बंधपत्र

मी /आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करीतो की मी/ आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पूरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या नमूद करीत आहे / आहोत.

जर माझी / आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी / आम्ही केल्यास या दरपत्राकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी / आम्ही दर पत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीलनुसार अट १ ते १८ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ :

दिनांक :

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नावः-

पत्ताः-